MHBI120007322022

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३९/२०२२ मधील नि.क्र. ०३
## खालील आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांना गैरअर्जदारांकडुन प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रु. ५,०००/– अंतरिम पोटगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र.१ हिचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असून अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे पती–पत्नी म्हणून नातेसंबंध आजतागायत कायम आहेत. गैरअर्जदार क्र.१ व २ हे आपसात भाऊ असून गैरअर्जदार क्र.३ ही गैरअर्जदार क्र.२ ची पत्नी आहे. गैरअर्जदार क्र.४ व ५ हे गैरअर्जदार क्र.१ व २ चे वडील आहेत. अर्जदार व गैरअर्जदार हे एकत्र कुटुंबाचे सदस्य आहेत. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह १८ वर्षांपूर्वी मौजे आमला, ता.धारूर, जि.बीड येथे धर्मशास्त्र व चालीरीती रिवाजाप्रमाणे झालेला असून अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे पती–पत्नीचे नातेसंबंध आजही कायम आहेत. अर्जदार क्र.१ चे गैरअर्जदार क्र.१ सोबत लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ यांच्या पासून अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ ही मुलगी झालेली आहे. अर्जदार क्र.१ चे आईवडीलांनी अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ च्या लग्नामध्ये संसारउपयोगी वस्तू गैरअर्जदार यांना दिलेल्या आहेत, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नातेवाईकांना ड्रेस घेतलेले आहेत, गैरअर्जदार क्र.१ यांना दोन तोळे सोन्याचे लॉकेट, एक तोळा सोन्याच्या दोन अंगठ्या असे एकूण तीन तोळे सोने गैरअर्जदार यांना दिलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ यांना चांगल्या प्रतिची जमीन असल्याने गैरअर्जदार क्र.१ यांना स्त्रीधन म्हणून रक्कम रू.५०,०००/– दिलेले आहेत.

३. अर्जदार क्र.१ हिचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ चे गैरअर्जदार

क्र.१ यांचे सोबत लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदण्यासाठी सासरी गेली. अर्जदार क्र.२ च्या जन्मापर्यंत गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हीस चांगले सांभाळले. परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ यांच्या स्वभावात बदल झाला व तो अर्जदार क्र.१ ते ३ यांच्याकडे दुर्लक्ष करू लागला. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदत असताना गैरअर्जदार क्र.१ यांनी कसल्याही प्रकारचे कारण नसताना अर्जदार क्र.१ हीस हानमार करू लागला, तिचा शारिरीक व मानसिक छळ करू लागला. त्याबाबत अर्जदार क्र.१ ने चौकशी केली असता गैरअर्जदार क्र.१ चे बाहेरील महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याचे अर्जदार क्र.१ च्या निदर्शनास आल्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होती परंतु त्याचा गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर कसल्याही प्रकारचा परिणाम झाला नाही. उलट गैरअर्जदार क्र.१ ने बेकायदेशीररित्या दुसरे लग्न केलेले आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे लोकांचे कर्ज झाले असल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ कडे रक्कम रू.१,००,०००/– ची मागणी करू लागला. गैरअर्जदार क्र.१ यांच्या स्वभावात बदल होईल या आशेवर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांच्यासोबत राहू लागली. गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे आपसात संगणमत करून अर्जदार क्र.१ चा शारिरीक व मानसिक छळ करू लागले. गैरअर्जदार क्र.५ ने अर्जदार क्र.१ हिचेसोबत मुलाचे सांगण्यावरून वाद निर्माण करण्यास सुरवात केली. गैरअर्जदार क्र.१ ते ५ हे म्हणू लागले की, तुझी आम्हाला गरज नाही, तू घरातून निघून जा. गैरअर्जदार क्र.१ ते ५ हे आपसात संगणमत करून अर्जदार क्र.१ चा शारिरीक व मानसिक छळ करू लागले. गैरअर्जदार यांच्या स्वभावात कसल्याही प्रकारचा बदल झाला नाही उलट अर्जदार क्र.१ हीस जास्तच त्रास देण्यास सुरवात केली. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे नांदत असताना गैरअर्जदारांनी पैशांची मागणी करून अर्जदार क्र.१ हिस शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा पैशांची मागणी करून अर्जदार क्र.१ ला हानमार करू लागला, उपाशीपोटी ठेवू लागला. गैरअर्जदार क्र.५ ही अर्जदारास हाणमार करू लागली.

दि.२०.०५.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी आपसात संगणमत करून अर्जदार क्र.१ हिस उपाशीपोटी ठेवून पैशांच्या मागणीसाठी अर्जदार क्र.१ यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याने अर्जदार क्र.१ ने घटनेची माहिती फोनवरून त्यांच्या भावास व वडिलांना सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र.१ चे वडील अभिमान पि. गणपती वारकड, भाऊ अमोल पि. अभिमाण वारकड हे गैरअर्जदारांकडे आले व त्यांना समजावून सांगितले परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उलट गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिस विटाने मारहाण केली व घराला कुलूप लावून निघून गेला.

४. अर्जदार क्र.१ हिचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी आपसात संगनमत करून अर्जदार क्र.१ हिस हाणमार केल्यामुळे अर्जदार क्र.१ ने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे अर्ज दाखल केला. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना उपाशीपोटी ठेवून त्यांचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. गैरअर्जदार यांना आमला, ता.धारूर, जि.बीड येथे घर व बागायत जमीन असून गैरअर्जदार हे त्या जमिनीमध्ये ऊस, कापूस, तूर, सोयाबीन यासारखे पीके घेतात. गैरअर्जदार यांना जमिनीमधून वर्षाकाठी खर्च वजा जाता रक्कम रू.२,००,०००/– उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.१ ह्या त्यांच्या आईवडिलांच्या घरी हलाकीचे जीवन जगत आहेत. अर्जदार क्र.१ चे वडील शेत मजूर असून अर्जदारांना सर्वसाधारण जीवन जगण्यासाठी, खाण्यापिण्यासाठी व औषधोपचारासाठी कसल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदारांना शेतीमधून व इतर मार्गाने प्रतीवर्षी तीन ते चार लाख रूपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदारांना प्रत्येकी प्रतीमहा रक्कम रू.५०००/– अंतरीम पोटगी देण्याची गैरअर्जदार क्र.१ ची ऐपत आहे.

५. गैरअर्जदार क्र.१ हे त्यांचे वकीलांमार्फत प्रकरणात हजर झाले. परंतु त्यांनी कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही. म्हणुन दिनांक ०५.०१.२०२४ रोजी त्यांच्याविरूध्द विना लेखी म्हणणेचा आदेश पारित करण्यात आला आहे. गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांना

प्रस्तुत अर्जाची नोटीस तामिल होवून देखील ते हजर न झाल्याने त्यांचे विरूध्द दि.२५.०६.२०२४ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला.

६. अर्ज, शपथपत्र, अर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्र याचे अवलोकन केले. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद सविस्तर ऐकला.

७. माझे विचारार्थ निघालेले मुददे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ हिने ती गैरअर्जदारांसोबत कौटूंबिक संबंधामध्ये राहत असताना गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केल्याची बाब प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार क्र. १ ते ३ हे गैरअर्जदारांकडून प्रत्येकी दरमहा र.रु.५,०००/– अंतरिम पोटगी म्हणून मिळणेस पात्र आहेत काय ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

८. अर्जदार यांनी अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, महिला व बालविकास विभाग, धारूर, ता.धारूर, जि.बीड यांचा अहवाल निशाणी क्र.१५ वर दाखल करण्यात आला आहे.

**मुद्दा क्रमांक १ बाबत**

९. अर्जदाराने तिच्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र दाखल केले असून तिने शपथेवर न्यायालयासमोर वर नमूद मजकूर मान्य केला आहे. अर्जदाराने असे कथन केले आहे की, लग्नानंतर गैरअर्जदार यांनी विनाकारण तिला त्रास देवून तिला उपाशी पोटी ठेवून पैशांची मागणी करुन तिला लाथाबुक्यांनी मारहाण केली. सदरच्या बाबी गैरअर्जदार यांनी म्हणणे देऊन नाकारलेल्या नाहीत. अर्जदाराच्या कथनावरून तिचा सदरचा छळ हा मुख्यत्वे गैरअर्जदार क्र. १ याने केल्याचे दिसुन येते.

१०. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम ३ नुसार माहेरहून पैसे घेवून यावेत म्हणून मानसिक, शारीरिक त्रास देणे, तिचा छळ करणे, शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे इत्यादी बाबींचा समावेश कौटुंबिक हिंसाचारामध्ये होतो. गैरअर्जदारांनी अर्जदारांचे आरोप नाकारलेले नाहीत. सदरच्या सर्व बाबी अर्जदार हिने शपथेवर कथन केलेल्या आहेत. तसेच अर्जदार क्र.१ तिच्या माहेरी अर्जदार क्र.२ व ३ सोबत रहात असल्याची बाब गैरअर्जदार यांनी नाकारलेली नाही. तसेच अर्जदार यांचा सांभाळ गैरअर्जदार करत असल्याचे गैरअर्जदारांचे कथन केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हे आर्थिकरित्या अडचणीत असताना गैरअर्जदार क्र.१ हा त्यांची आर्थिक मदत करत नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सद्यस्थितीला अर्जदार क्र.१ हिने कथित केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेता गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार करत असल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. म्हणून मुद्दा नं.१ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २</u> <u>बाबत</u>**:-

११. अर्जदार हिचे कथनानूसार तिला कोणतेही उदरनिर्वाह व उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे ती स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. ती सध्या माहेरी आश्रीताचे जीवन जगत आहे. अर्जदार क्र.१ ही आपल्या आई-वडीलांचे घरी हालाखीचे जिवन जगत आहे. अर्जदार क्र.१ चे वडील शेत मजुर असुन अर्जदार क्र.१ ते ३ यांना सर्वसाधारण

जिवन जगण्यासाठी व खाण्यापिण्यासाठी, औषध उपचारासाठी कसल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. याउलट गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. अर्जदारांच्या मते गैरअर्जदार यांना आमला, ता.धारूर, जि.बीड येथे घर व बागायत जमीन असून गैरअर्जदार हे त्या जमिनीमध्ये ऊस, कापूस, तूर, सोयाबीन यासारखे पीके घेतात. गैरअर्जदार यांना जमिनीमधून वर्षाकाठी खर्च वजा जाता रक्कम रू.२,००,०००/– उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी प्रतिमहा रक्कम रू. ५०००/– अंतरिम पोटगी देण्याची गैरअर्जदार क्र.१ ची ऐपत आहे. गैरअर्जदार क्र.१ ने तो अर्जदारांना पोटगी देणेस कसा असमर्थ आहे याबाबत कोणताही पुरावा याकामी दिलेला नाही. तसेच तो शरीराने सक्षम असल्याची बाब नाकारलेली नाही. यामुळे सकृतदर्शनी अर्जदारांना पोटगी देणेस गैरअर्जदार नं.१ हा सक्षम आहे, या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे. परंतु अर्जदार यांनी गैरअर्जदारांच्या मालमत्तेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयासमोर दाखल केलेला नाही. तसेच गैरअर्जदार क्र.१ याचेवर कोणी अवलंबून असल्याचे गैरअर्जदार क्र.१ याचे कथन नाही. अशा परिस्थितीत, अर्जदाराची पालनपोषण करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ याचेवर पती व पिता या नात्याने असल्याने अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र.१ याचेकडून दरमहा र.रु.१५००/– व अर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदार क्र.१ याचेकडून प्रत्येकी दरमहा र.रु.१,०००/– अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबत</u>**:–

१२. मुददा क्र.१ बाबत होकारार्थी व मुददा क्र.२ बाबत अंशतः होकारार्थी मत नोंदवून मी मुद्दा क्र.३ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार नं.१ याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा र.रु.१५००/– (रु.एक हजार पाचशे मात्र) व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१,०००/– (रु.एक हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून द्यावेत.

३. प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांतर्फे कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय तीन पेक्षा अधिक मुदत घेतल्यास त्या कालावधीची पोटगी मागण्याचा अधिकार अर्जदारांना असणार नाही.

४. अर्जाचा खर्च मुळ अर्जासोबत.

५. आदेशाची प्रत अर्जदाराला मोफत देण्यात यावी.

६. आदेशाची एक प्रत संबंधीत पोलीस ठाणेस पाठविणेत यावी.

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2025.08.02 14:39:00 +0530

स्थळ–धारुर (निलेश एम वाली )

दिनांक ०१.०८.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

धारुर

## :: **Certificate of Stenographer** ::

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order. "

Sd/-
(Amol D.Mule)
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur